सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२३/2907
दिनांक 18 OCT 2023

प्रति,
प्राचार्य,
सर्व तांत्रिक पदविका,पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्याक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : दिनांक १९.१०.२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांचे हस्ते उद्घाटन होणाऱ्या प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्राच्या** उद्घाटन**सोहळयात सहभागी होणेबाबत..**

**संदर्भ :** मा.संचालक, तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीपी/कौशल्य विकास केंद्र/२०२३/९२९ दिनांक १८ ऑक्टोबर २०२३

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र ही संकल्पना राज्यातील तरुणांच्या रोजगार संधीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारी असून ग्रामीण भागातील तरुणांच्या रोजगार संधी आणि त्यांना स्वावलंबी करण्याला प्राधान्य देण्यासाठी सदर योजना करण्यात आलेली आहे.

राज्यातील एकूण ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केद्रांचे उद्घाटन भारताचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवार १९ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजता ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. तरुणांच्या रोजगार संधी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारे हे महत्वाचे पाऊल आहे. त्यामुळे या केंद्राची माहिती या उद्घाटन सोहळ्याच्या माध्यमातून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहे. सदर सोहळा दिनांक १९.१०.२०२३ रोजी दुपारी ठीक ४.०० वाजता सुरु होणार असून तो https://www.youtube.com/live/IBsVAE13pL8?si=FaPX4nqrou9aFI4R या लिंकवर उपलब्ध आहे.

तरी उपरोक्त सोहळ्यास संस्थेतील अधिकारी,कर्मचारी व विद्यार्थ्यांना सहभागी होण्याबाबत सूचित करण्यात यावे.

**(मनोज म.अंधारे)**
**सहाय्यक संचालक,(तांत्रिक)**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:**
**प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.